# <u>प्रेसनोट</u>

दि. ०६/०६/२०२३

सजा - वाघोली, ता. हवेली, जि. पुणे येथील तलाठी कार्यालयात काम करणा-या दोन खाजगी इसमांवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ४४७/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ अ, १२. |
| तक्रारदार | पुरूष, वय - ४६ वर्षे |
| आरोपीचे नाव | १) भाऊसाहेब भिकाजी गिरी, वय ५६ वर्ष, रा. साई बालाजी सोसायटी, आव्हाळवाडी, वाघोली, जि. पुणे. (खाजगी इसम)<br>२) संजय मारुती लगड, वय ५३ वर्ष, रा. साईनगर, लोहगाव, ता.हवेली, जि. पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- (पन्नास हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- ११/०५/२०२३ व १२/०५/२०२३.
गुन्हा दाखल दिनांक :- ०६/०६/२०२३

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या पत्नीचे नावे खरेदी केलेल्या जागेची नोंद ७/१२ उता-यावर घेण्यासाठी वाघोली तलाठी कार्यालय, ता. हवेली, जि. पुणे येथे अर्ज केला होता. ७/१२ उता-यावर नोंद घेण्यासाठी तलाठी कार्यालय वाघोली येथे मदतनीस म्हणून काम करणारे संजय लगड व गिरी यांनी तलाठयांकडून काम करून देण्यासाठी लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता जागेची नोंद ७/१२ उता-यावर घेण्यासाठी सजा - वाघोली तलाठी कार्यालयात मदतनीस म्हणून काम करणारे खाजगी इसम १) भाऊसाहेब गिरी यानी तलाठी श्री. पटांगे यांच्यासाठी ४५ हजार रुपये व त्यांच्या स्वतःसाठी ५ हजार रुपये लाचेची मागणी केली. त्या लाच मागणीस खाजगी इसम २) संजय लगड यानी सहाय्य केले म्हणुन त्या दोघांविरुद्ध वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला असून, दोघांना अटक करण्यात आली आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उप अधीक्षक माधुरी भोसले तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे - खराडे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.